राष्ट्रीय आरोग्य अभियान
कार्यालय, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली
E-mail – nhmgadchiroli2021@gmail.com

आरोग्य सेवा

जा.क्र.NHM/आस्था/8606/२०२६.
कार्यालय, जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, गडचिरोली.
दिनांक ०४ / ११ /२०२६.

उमेदवारांकरीता सुचना

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत तसेच १५ व्या वित्त आयोगांतर्गत विविध कार्यक्रमामध्ये २४ संवर्गातील रिक्त असलेली १७२ पदे भरण्यासाठी भरतीप्रक्रिया सुरु असून प्रसिद्ध जाहिरातीनूसार अर्ज सादर केलेल्या सर्व उमेदवारांच्या मुळ कागदपत्रांची पडताळणी दिनांक ०३/०२/२०२६ ते १३/०२/२०२६ या कालावधीत करण्यात आलेली आहे. सदर मुळ कागदपत्र पडताळणी अंती संवर्गनिहाय अंतरिम पात्र / अपात्र उमेदवारांची यादी दिनांक १३/०३/२०२६ रोजी संकेतस्थळावर प्रसिद्ध करुन उमेदवारांना काही आक्षेप / हरकती असल्यास दिनांक १६/०३/२०२६ ते २३/०३/२०२६ या कालावधीत आक्षेप अर्ज योग्य त्या पुराव्यासह सादर करण्याबाबत कळविलेले होते. त्यानूसार सदर कालावधीत या कार्यालयाकडे प्राप्त झालेले आक्षेप विचारात घेवून अंतिम पात्र / अपात्र उमेदवारांची यादी व निकाल तयार करण्यात आलेले आहे.

सदर पदभरतीबाबत राज्यस्तरावरुन दिनांक २७/०४/२०२६ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या मार्गदर्शक सुचनांचे अनुषंगाने दिनांक ३०/०४/२०२६ रोजी उमेदवारांकरिता सुचना निर्गमित करुन पदभरतीस तात्पूरती स्थगिती देण्यात आलेली होती.

त्यानंतर सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडील शासन निर्णय दिनांक ३० जुन २०२६ नूसार राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राज्यातील कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांपैकी १० वर्षे व त्यापेक्षा जास्त सेवा झालेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांकरिता अधिसंख्य पदे निर्माण करुन त्यासाठी आवश्यक खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच अशाप्रकारे कंत्राटी नियुक्ती नियमित करण्याची प्रकरणे उद्भवू नयेत म्हणून यापुढे राष्ट्रीय आरोग्य अभियानातील मनुष्यबळाच्या सेवा केवळ बाह्यस्त्रोताद्वारे / सेवा कराराने (Service Contract) घेण्यात याव्यात, असे नमुद करण्यात आलेले असल्याने मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक राआसोम/ मनुष्यबळ/ बाह्यस्त्रोत पदभरती/ १४३८०७ - १४४१२२/ २०२६. दिनांक २८/१०/२०२६ अन्वये यापुढे राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटी पदभरती करता येणार नसल्याचे स्पष्ट केलेले आहे.

त्यामुळे उपरोक्त नमुद पदभरती संपूर्णतः याद्वारे रद्द करण्यात येत आहे, याची सर्व संबधितांनी नोंद घ्यावी.

सदस्य (निवड समिती) तथा
जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक
रा.आ.अ. गडचिरोली

आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक,
राष्ट्रीय आरोग्य अभियान
सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

दुरध्वनी – ०२२ – २२७१७५००
फॅक्स – ०२२ – २२६४२९५५
E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com

आरोग्य भवन, ३रा मजला,
सेंट जॉर्ज रूग्णालय आवार, पी. डिमेलो रोड,
सीएसटी जवळ, फोर्ट, मुंबई ४०००००१

महत्वाचे

जा.क्रं.राआसोम/मनुष्यबळ/बाह्यस्त्रोत पदभरती/ /२०२६
दि. २८/१०/२०२६ 9436040-9488922

प्रति,

१) संचालक, राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था, नागपूर
२) उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळ (सर्व),
३) जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, (सर्व)
४) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
५) प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र (सर्व)
६) वैद्यकिय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका (सर्व)
७) परिमंडळ कार्यक्रम व्यवस्थापक, आरोग्य सेवा परिमंडळ (सर्व)
८) जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक/जिल्हा लेखा व्यवस्थापक, जिल्हा परिषद, (सर्व)

विषय : राष्ट्रीय आरोग्य अभियान व विविध कार्यक्रमांतर्गत विभाग/जिल्हा/मनपा स्तरावरील रिक्त पदांच्या पदभरती बाह्यस्त्रोत व्दारे करण्याबाबत.

संदर्भ : १) शासन निर्णय दि. ३०.०६.२०२६ (अधिसंख्य पदे / समायोजनाबाबत).
२) मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक, रा.आ.अभियान, मुंबई यांचे जा.क्र. राआअ/खरेदी व बाह्यस्त्रोत भरती/९५९४०-२४७/२०२६ दि. २३.०७.२०२६ रोजीचे पत्र.
३) शासनाचे दि. ११.०९.२०२६ रोजीचे बाह्यस्त्रोत भरतीबाबत या कार्यालयास प्राप्त पत्र.
४) मा.आयुक्त,आरोग्य सेवा तथा संचालक,रा.आ.अभियान, मुंबई. यांचेकडुन मंजुर नस्ती.

उपरोक्त विषयान्वये संदर्भ क्र. १ येथील दि. ३०.०६.२०२६ च्या शासन निर्णयानुसार राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राज्यातील कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांपैकी १० वर्षे व त्यापेक्षा जास्त सेवा झालेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांकरिता अधिसंख्य पदे निर्माण करून त्यासाठी आवश्यक खर्चास मान्यता देण्यात आली आहे. तसेच, अशा प्रकारे कंत्राटी नियुक्ती नियमित करण्याची प्रकरणे उद्भवू नयेत म्हणून यापुढे राष्ट्रीय आरोग्य अभियानातील मनुष्यबळाच्या सेवा केवळ बाह्यस्त्रोताद्वारे / सेवा कराराने (Service Contract) घेण्यात याव्यात, असे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे यापुढे राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटी पदभरती करता येणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

तसेच संदर्भ क्र. २, दि. २३.०७.२०२६ च्या पत्रान्वये पुढीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या :

१. पुढील आदेशापर्यंत जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक (DPM) व जिल्हा लेखा व्यवस्थापक (DAM) यांच्या स्तरावरून अथवा त्यांच्यामार्फत रा.आ.अभियानाच्या कोणत्याही कार्यक्रमाच्या निधीतून नवीन खरेदी प्रक्रिया, निविदा, दरपत्रक, खरेदी आदेश (Purchase Order), कार्यादेश (Work Order) अथवा नवीन वित्तीय बांधिलकी निर्माण करणारी कार्यवाही करू नये.

२. अत्यावश्यक रुग्णसेवा / सार्वजनिक आरोग्य सेवा बाधित होण्याची शक्यता असलेल्या बाबींमध्ये खरेदी अपरिहार्य असल्यास, सविस्तर प्रस्ताव परिमंडळ कार्यक्रम व्यवस्थापकांमार्फत उपसंचालक, आरोग्य सेवा (परिमंडळ) यांच्याकडे सादर करून त्यांची विशेष पूर्वमान्यता घेतल्यानंतरच खरेदी प्रक्रिया राबवावी.

३. पुढील आदेशापर्यंत जिल्हास्तरावर बाह्यस्त्रोत (Outsource) एजन्सीमार्फत नवीन मनुष्यबळ भरती, मनुष्यबळ उपलब्ध करून घेण्याची प्रक्रिया, नवीन कार्यादेश निर्गमित करणे, विद्यमान कराराचा सेवाविस्तार (Extension) अथवा नूतनीकरण (Renewal) यांबाबतची कार्यवाही तात्काळ स्थगित करावी.

तथापि, संदर्भ क्र. ४ अन्वये प्राप्त मंजुरीस अनुसरुन संदर्भ क्र. २ अन्वये निर्गमित सर्व निर्देशांना पुढील आदेशापर्यंत स्थगिती देण्यात येत आहे.

यास्तव,सन २०२६-२७ च्या मंजूर प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यानुसार (PIP) विविध कार्यक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संदर्भ क्र. १ व ३ येथील शासन निर्णय / पत्रातील मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यस्तरावरुन बाह्यस्त्रोत सेवा पुरवठादार संस्थेमार्फत विहित निविदा प्रक्रियेद्वारे मनुष्यबळाच्या सेवा घेण्याकरिता संस्थेच्या निवड प्रक्रियेसाठी विलंब होण्याची शक्यता आहे. हा विलंब लक्षात घेता, तसेच मंजूर मनुष्यबळाच्या सेवांची आवश्यकता विचारात घेता, पुढील आदेशापर्यंत खालील रिक्त पदांच्या सेवा बाह्यस्त्रोत सेवा पुरवठादार संस्थेमार्फत, विहित पद्धतीचा अवलंब करून निविदा प्रक्रियेद्वारे, संबंधित स्तरावरून (विभाग / जिल्हा / मनपा व इतर संस्था) उपलब्ध करून घेण्यास मान्यता देण्यात येत आहे :

अ) Service Delivery (SD) मधील अतिविशेषतज्ज्ञ (Super Specialist), विशेषतज्ज्ञ (Specialist), वैद्यकीय अधिकारी (Medical Officer) व Support Staff या संवर्गातील सद्यस्थितीत रिक्त पदे;

ब) Service Delivery (SD) मधील उर्वरित विविध संवर्गातील रिक्त पदे;

सदर कार्यवाही करताना पुढील बाबींचे काटेकोर पालन करण्यात यावे :

१. बाह्यस्त्रोत भरती केवळ सन २०२६-२७ च्या मंजूर PIP मधील मंजूर व रिक्त पदांसाठीच, तसेच मंजूर अनुदान / तरतुदीच्या मर्यादेत करावी.

२. संदर्भ क्र. १ व ३ येथील शासन निर्णय व मार्गदर्शक सूचनांनुसार तसेच शासनाच्या खरेदीविषयक नियमावलीनुसार विहित निविदा प्रक्रिया पारदर्शकपणे राबवावी.

३. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत यापुढे कोणत्याही स्वरूपाची थेट कंत्राटी नियुक्ती करण्यात येऊ नये.

४. बाह्यस्त्रोत सेवा पुरवठादार संस्थेशी करावयाचा करार / कार्यादेश शासन निर्णयातील अटी व शर्तींनुसार असावा. कामकाजात अडचणी उद्भवल्यास स्थानिक वित्त विभागाच्या मंजुरीने कार्यवाही करावी.

५. भरती प्रक्रियेची सद्यस्थिती (पदनिहाय रिक्त पदे, निविदा प्रक्रियेची स्थिती, नियुक्त झालेले मनुष्यबळ) याबाबतचा अहवाल दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत परिमंडळ कार्यक्रम व्यवस्थापकांमार्फत या कार्यालयास सादर करावा.

वरील निर्देश पुढील आदेशापर्यंत लागू राहतील. सदर पत्र सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून त्याप्रमाणे तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

(संजय श्रीपतराव काटकर,भा.प्र.से,)
आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक,
राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई

प्रत माहितीस्तव सविनय सादर :

१) मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) मा. सचिव-२, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव :-

१) आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
२) व्यवस्थापकीय संचालक, सिडको, नवी मुंबई.
३) मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद (सर्व)
४) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई /पुणे
५) अतिरिक्त अभियान संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई
६) संचालक (वित्त व लेखा) राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
७) सहसंचालक (तांत्रिक) राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
८) अधिक्षक अभियंता , राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
९) सहसंचालक, आरोग्य सेवा (राअंनिका/ असंसर्गजन्य रोग) , मुंबई
१०) सहसंचालक , आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्यरोग) , पुणे
११) सहसंचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग व क्षयरोग) , पुणे
१२) सहसंचालक, आरोग्य सेवा (परिवहन) , पुणे
१३) उपसंचालक, आरोग्य सेवा (मौखिक आरोग्य),मुंबई
१४) उपसंचालक, आरोग्य सेवा (शुश्रुषा),मुंबई.
१५) उपसंचालक, आरोग्य सेवा (आ.मा.जि.आ) , पुणे
१६) सहायक संचालक (एनयुएचएम), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
१७) सहायक संचालक (आयुष), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
१८) अधिष्ठाता, शासकीय वैदयकीय महाविदयालय व रुग्णालय (संबंधित)
१९) सहायक संचालक, आरोग्य सेवा (एकात्मिक साथरोग सर्वेक्षण प्रकल्प, पुणे)
२०) मुख्याधिकारी, देवळाली, पुणे, खडकी व देहू रोड कटकमंडळे

२१) मुख्याधिकारी, एनयूएचएम अंतर्गत सर्व नगरपालिका

२२) कार्यकारी संचालक, राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र , पुणे.

२३) वैद्यकीय अधिक्षक,कामा हॉस्पिटल,मुंबई

२४) राज्य कार्यक्रम व्यवस्थापक (एनएचएम/ एनयूएचएम), राआसो, मुंबई

२५) वरिष्ठ सल्लागार (मनुष्यबळ), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई

२६) शहर कार्यक्रम व्यवस्थापक/ शहर लेखा व्यवस्थापक, रा.ना.आ.अभियान, महानगरपालीका (सर्व)

२७) प्रशासकिय अधिकारी, आस्थापना, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.

२८) निवड नस्ती / कार्यालयीन प्रत.



Digitally signed by
Sanjay Shripatrao Katkar
Date: 28-10-2026
15:17:13

राष्ट्रीय आरोग्य अभियानातंर्गत राज्यातील कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यापैकी १० वर्ष व त्यापेक्षा जास्त सेवा झालेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांकरीता अधिसंख्य पदे निर्माण करुन आवश्यक खर्चास मान्यता देणे.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांक:- एनएचएम-११२५/प्र.क्र.४५५/एनएचएम (ई-१३२०९२५)

१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकूल इमारत
नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
दिनांक : ३० जून, २०२६

वाचा :-

१. सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र:- बैठक-२८२३/प्र.क्र.४३०/आरोग्य-७, दि.१४.०३.२०२४
२. शासन निर्णय समक्रामंक.:- बैठक-११२५/प्र.क्र. ४५५/ एनएचएम, दिनांक ०४.११.२०२५
३. शासन निर्णय समक्रामंक :- बैठक-११२५/प्र.क्र. ४५५/ एनएचएम, दिनांक १७.११.२०२५

प्रस्तावना :-

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचा-यांपैकी १० वर्ष व त्यापेक्षा जास्त सेवा झालेल्या कर्मचा-यांच्या सेवा समायोजनासाठी दि.१३.०३.२०२४ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीतील निर्णयानुसार शासन निर्णय दि.१४.०३.२०२४ निर्गमित करण्यात आला होता. यासंदर्भात दिनांक ०४.११.२०२५ रोजीच्या मा.मंत्रीमंडळाच्या मान्यतेने दिनांक १४.०३.२०२४ रोजीच्या शासन निर्णयाच्या दिनांकापर्यंत सलग १० वर्ष सेवा पूर्ण झाली आहे, अशा कर्मचा-यांना एक वेळची विशेष बाब म्हणून सार्वजनिक आरोग्य विभाग व ग्राम विकास विभागातील आरोग्य सेवेतील समकक्ष नियमित पदांवर सेवा समायोजन करण्याबाबत संदर्भ क्र.०२ अन्वये शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. तसेच मा. मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचा-यांचे नियमित पदांवरील समायोजनाकरीता निकष ठरविण्यासाठी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय दि.१७.११.२०२५ अन्वये आंतर विभागीय समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीच्या बैठकीमध्ये झालेल्या चर्चेस अनुसरून मा.मंत्रीमंडळाने दि.२५.०६.२०२६

रोजीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :-

राष्ट्रीय आरोग्य अभियानातंर्गत राज्यातील कार्यरत कंत्राटी कर्मचा-यांपैकी १० वर्ष व त्यापेक्षा जास्त सेवा झालेल्या कंत्राटी कर्मचा-यांकरीता अधिसंख्य पदे निर्माण करुन आवश्यक खर्चास मान्यता देण्याच्या अनुषंगाने दिनांक २५/०६/२०२६ रोजी मा. मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयास अनुसरुन खालील प्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे :-

०१. मा.मंत्रिमंडळाच्या बैठकीच्या दिनांकास (दि.२५.०६.२०२६) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत तांत्रिक खंड वगळून १० वर्षे व त्याहून अधिक वर्षे कंत्राटी सेवा पूर्ण करणाऱ्या १५,०१० इतक्या कर्मचाऱ्यांना **एक वेळची विशेष बाब म्हणून** समकक्ष वेतनश्रेणीतील अधिसंख्य पद निर्माण करुन त्यावर नियुक्ती देण्याच्या कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे.

०२. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांकरिता ते सध्या कार्यरत असलेल्या कंत्राटी पदाची सद्यस्थितीत सार्वजनिक आरोग्य व ग्राम विकास विभागात उपलब्ध नियमित मंजूर पदांशी समकक्षता निश्चित करुन संबंधित वेतनश्रेणी निश्चित करण्याबाबत सार्वजनिक आरोग्य विभागाने वित्त विभागास प्रस्ताव सादर करुन आवश्यक मान्यता घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

०३. जर कार्यरत कंत्राटी पदांसाठी समकक्षतेनुसार वेतनश्रेणी ठरविण्यासाठी या विभागात नियमित मंजूर पद उपलब्ध नसेल तर इतर विभागांमधील तुलनात्मक समकक्ष पदांची तपासणी करावी आणि या पदांसाठी समकक्ष वेतनश्रेणी निश्चित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

०४. सदर कार्यवाही करतांना सदर कंत्राटी पदाच्या कामाचे स्वरुप, कर्तव्य व जबाबदाऱ्या, मानधनाची रक्कम व शासनातील समकक्ष नियमित पदाचे सेवाप्रवेश नियम, शैक्षणिक व इतर अर्हता, कर्तव्य व जबाबदाऱ्या या बाबी लक्षात घेऊन कंत्राटी पदाची समकक्ष वेतनश्रेणी निश्चित करण्याबाबत सार्वजनिक आरोग्य विभागाने वित्त विभागास प्रस्ताव सादर करुन आवश्यक मान्यता घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

०५. सदर वेतनश्रेणी निश्चित करताना समकक्ष पदांच्या ७ व्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी विचारात घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

०६. याप्रमाणे कंत्राटी पदाशी समकक्ष ठरविण्यात आलेल्या पदांकरिता विभागाने अधिसंख्य पद निर्माण करुन संबंधित पात्र उमेदवारांना त्यावर नियुक्ती देण्याबाबत संबंधित विभागांनी कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

०७. प्रस्तावित अधिसंख्य पदाकरिता समकक्ष संवर्गाच्या वेतनश्रेणीमधील निम्न स्तरावरील मुळ वेतन अनुज्ञेय करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

०८. प्रस्तावित अधिसंख्य पदाकरिता कर्मचाऱ्यांचे सध्या तो घेत असलेले वेतन संरक्षित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

०९. सदर कर्मचाऱ्यांना निम्न स्तरावरील मूळ वेतनाशिवाय महागाई भत्ता व प्रवास भत्ता लागू राहील.

१०. निर्माण करण्यात येणाऱ्या अधिसंख्य पदांवरील कर्मचाऱ्यांना पदोन्नती, आश्वासित प्रगती योजना, सेवानिवृत्ती/कुटुंब निवृत्ती वेतन योजना लागू राहणार नाही.

११. सदर अधिसंख्य पदावरील कर्मचाऱ्यांना "राष्ट्रीय आरोग्य अभियान" योजने अंतर्गत सद्यस्थितीत देय असलेल्या रजा अनुज्ञेय राहतील.

१२. निर्माण करण्यात येणारी अधिसंख्य पदे व्यक्ती सापेक्ष असून समकक्ष पदांसाठी निश्चित करण्यात आलेल्या कमाल वयोमर्यादा, राजीनामा, आजारपण, मृत्यू इत्यादी कारणामुळे रिक्त झाल्यास ते पद व्यपगत होईल. या अधिसंख्य पदावर नवीन नियुक्ती करता येणार नाही. या कर्मचाऱ्यांना पूर्वी केलेल्या कंत्राटी सेवेसंदर्भात कोणतेही लाभ अनुज्ञेय राहणार नाहीत.

१३. सदर पदावरील कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्त्वावरील नियुक्ती अनुज्ञेय नसेल .

१४. सदर अधिसंख्य पदनिर्मितीस अपवादात्मक परिस्थितीत केवळ एक वेळची बाब म्हणून मान्यता देण्यात येत आहे. त्यामुळे या योजनेव्यतिरिक्त इतर विभागातील कोणत्याही योजनेसाठी/ प्रयोजनासाठी सदर बाब पूर्वोदाहरण म्हणून वापरता येणार नाही.

१५. अधिसंख्य पद निर्माण करण्याबाबत व त्यांना द्यावयाचे वेतन भत्ते याबाबत वित्त विभागाच्या सहमतीने निर्णय घेण्यात येईल.

१६. सदर कंत्राटी कर्मचारी कार्यरत असेपर्यंतच सदर अधिसंख्य पद अस्तित्वात राहील. त्यानंतर ते आपोआप व्यपगत होईल. या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या अधिसंख्य पदावर सेवेची कमाल वयोमर्यादा ५८ इतकी निश्चित करण्यात येत आहे. याअनुषंगाने काही विशिष्ट पदांकरिता सदर कमाल वयोमर्यादेसंदर्भात बाबी उद्भवत असल्यास वित्त विभागाच्या सहमतीने याबाबत निर्णय घेण्यात यावा.

१७. सदर प्रकरणी निर्माण करण्यात आलेले अधिसंख्य पद मा.मंत्रिमंडळाच्या बैठकीच्या दिनांकापासून अस्तित्वात येईल. पूर्वलक्षी प्रभावाने अधिसंख्य पदनिर्मिती करता येणार नाही.

१८. अशा प्रकारे कंत्राटी नियुक्ती नियमितीकरणाची प्रकरणे उद्भवू नये म्हणून यापुढे राष्ट्रीय आरोग्य अभियानातील मनुष्यबळाच्या सेवा या केवळ बाह्यस्त्रोताद्वारे/ सेवा कराराने (service contract) घेण्यात याव्यात. योजनेच्या अनुषंगाने बाह्यस्त्रोताद्वारे या सेवा उपलब्ध करुन घेण्याबाबत काही अडचणी उद्भवत असल्यास वित्त विभागाच्या मंजुरीने याबाबत कार्यवाही करावी.

१९. यापुढे या योजनेतील पदनिर्मितीबाबत निर्णय वित्त विभागाच्या उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेने घेण्यात यावा.

२०. सदर अधिसंख्य पदांच्या वेतना करीता येणा-या अंदाजित रु. ११५३.६० कोटीच्या (वार्षिक) खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०६३०१३३०१८९३१७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

E RAVENDIRAN

Digitally signed by E RAVENDIRAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Public Health Department, 2.5.4.20=27C7864CB9365745BD649C5712D9ACB85CD5D3C1B1E2A86C7EFD187D0A67D736, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=4886DF058037811024FA626BC67680B04D083F7C4CF620FEB179540C792CS04F, cn=E RAVENDIRAN
Date: 2026.06.30 14:17:34 +05'30'

(ई.रविंद्रन)
सचिव-२, सार्वजनिक आरोग्य विभाग,
महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव (५ प्रती) (पत्राने)
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव (५ प्रती), मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
३. मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव (नगरविकास), मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
४. मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव (क्रीडा व युवक कल्याण), मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
५. सर्व मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
६. मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
७. सर्व सन्माननीय संसद सदस्य, विधानसभा व विधानपरिषद सदस्य
८. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
९. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)- १, महाराष्ट्र, मुंबई.
१०. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,
११. प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)- १, महाराष्ट्र, मुंबई.
१२. प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा) २, महाराष्ट्र, नागपूर,
१३. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
१४.महाप्रबंधक, मा. मुंबई उच्च न्यायालय, मुंबई.
१५. प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई.
१६. प्रबंधक, मा. लोकायुक्त व मा. उप लोकायुक्त यांचे कार्यालय, नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई.
१७. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
१८. मा. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, मुंबई,
१९. वित्त विभाग/ व्यय- १३, मंत्रालय, मुंबई-
२०.नियोजन विभाग / कार्यासन १४७२, मंत्रालय, मुंबई.
२१. आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई-
२२ सर्व जिल्हाधिकारी,

२३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२४. संचालक (रुग्णालये), आरोग्य सेवा , मुंबई
२५. संचालक (प्राथमिक) आरोग्य सेवा, पुणे
२६. अतिरिक्त अभियान संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई
२७. अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, माताबाल संगोपन व शालेय आरोग्य पुणे
२८. उप संचालक, सर्व मंडळ कार्यालये
२९. सर्व जिल्हा शल्य चिकित्सक, (FWB मार्फत)
३०. सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी, (FWB मार्फत)
३१. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
३२. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
३३. वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे
३४. सर्व कोषागार अधिकारी
३५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (५ प्रती)
३६.भारती जनता पार्टी,महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरेक नं.१, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईट, मुंबई -४०००२०
३७. इंडियन नॅशनल कॉग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग दादर , मुंबई -४०००२५
३८.राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी, राष्ट्रपती भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पाईंट, मुंबई-४०००२१.
३९. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-४०००१
४०. बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई- ४००००१
४१. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभवन, एस.व्ही. पटेल रोड, मुंबई
४२. भारतीय कम्युनिस्ट (मार्क्सवादी) पार्टी, महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई.
४३. सह सचिव/ उपसचिव/ अवर सचिव/ कक्ष अधिकारी, कार्यासन सेवा-५, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
४४. सार्वजनिक आरोग्य विभागातील सर्व कार्यासने, मंत्रालय, मुंबई- ४००००१
४५. निवडनस्ती (कार्यासन एनएचएम)...